**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र कमांक / नाविमं / पमा / 4354
दिनांक : 01 / 12 / 2022
02

प्रति,

सर्व प्राचार्य, / मुख्याध्यापक,
मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये / विद्यालये,
नागपूर विभाग.

**विषय:– शास्त्रीय कला,(गायन,वादन,नृत्य),चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या तसेच खेळाडू, एन.सी.सी.,स्काउट व गाईड विद्यार्थ्याच्या प्रस्तावांना छाननी शुल्क आकारणी करणेबाबत.**

संदर्भ:– राज्य मंडळ पत्र क.रा.मं. / परीक्षा–2 / 6487 दि. 28 / 11 / 2022.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, व माध्य शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10वी) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी) **शास्त्रीय कला,(गायन,वादन,नृत्य),चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या तसेच खेळाडू, एन.सी.सी.,स्काउट व गाईड विद्यार्थ्याच्या प्रस्तावांना छाननी शुल्क आकारणी करणेबाबत परीक्षा समितीचे शिफारसीनुसार, कार्यकारी परिषदेने दिलेल्या मान्यतेने राज्य मंडळाचे संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात आले आहे.**

तेव्हा फेब्रुवारी / मार्च 2023 च्या परीक्षेपासून प्रती विद्यार्थी रु.50 / – (रुपये पन्नास फक्त) छाननी शुल्क आकारण्यात येणार आहे.

**तरी आपले शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत सादर करण्यात येणा–या प्रस्तावांसोबत प्रती विद्यार्थी रु.50 / – (रुपये पन्नास फक्त) छाननी शुल्क चलानव्दारे भरुन चलानसह कीडा प्रस्ताव जिल्हा कीडा अधिकारी यांचेमार्फत, एन.सी.सी., स्काउट व गाईड प्रस्ताव जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), यांचेमार्फत तर शास्त्रीय कला,(गायन,वादन,नृत्य),चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा–या व लोककला प्रकारात सहभागी होणा–या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विहित पध्दतीने निर्धारित कालावधीत मंडळाकडे सादर करण्यात यावे.**

**(चिंतामण वंजारी)**
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर.